939 96

**विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांत रोहयोखालील सिंचन विहीरींचा धडक कार्यक्रम -लाभार्थी निवड समितीबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांकः धविका-२००९/प्र.क्र.३६०/रोहयो-५,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : २३ मार्च, २०११.**

पहा :- १) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : रोहयो-२००६/प्र.क्र.१३०/रोहयो-१०, दिनांक १५ डिसेंबर, २००६.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : रोहयो-२००६/प्र.क्र.१३०/रोहयो-१०, दिनांक २१ मे, २००७.
३) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : रोहयो- २००७/प्र.क्र.२०४/ रोहयो-५, दिनांक ६ फेब्रुवारी, २००८.
४) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : रोहयो-२००९/प्र.क्र.१६/रोहयो-५, दिनांक २३ जानेवारी, २००९
५) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : रोहयो-२००९/प्र.क्र.३६०/रोहयो-५, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१०

**प्रस्तावना :**

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या सहा जिल्हयांमध्ये प्रत्येक तालुक्यांस १००० याप्रमाणे ६४,००० सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम दिनांक १५/१२/२००६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आला आहे. तसेच या जिल्हयातील प्रत्येक तालुक्याला ३०० विहिरी याप्रमाणे १९,२०० विहिरींचा अतिरिक्त लक्षांक देण्यात आला आहे. अशाप्रकारे या कार्यक्रमाअंतर्गत एकूण ८३,२०० लक्षांकानुसार लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी संबंधित जिल्ह्यांचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आणि संबंधित जिल्ह्यांचे संपर्क मंत्री यांचे सह अध्यक्षतेखाली संदर्भीय दिनांक ६/२/२००८ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्याकरिता एक याप्रमाणे उपरोक्त ६ जिल्ह्यांत ६ समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. तद्नंतर सदर योजनेच्या लाभार्थ्यांची तातडीने निवड करण्याच्या अनुषंगाने पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीची रचना बदलून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त ६ जिल्ह्यांमध्ये संदर्भीय दिनांक ६/२/२०१० च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती.

२. याबाबत शासनाने फेरविचार केला असून आता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :**

शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांकःरोहयो-२००९/प्र.क्र.३६०/रोहयो-५, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१० अधिक्रमित करण्यात येत आहे. त्याऐवजी धडक सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची निवड अंतिम करण्यासाठी विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या सहा जिल्हयांत मा.पालकमंत्री

यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे जिल्हास्तरावर समिती नेमण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्हयाचे मा.पालक मंत्री | अध्यक्ष |
| २ | संबंधित जिल्हयाचे मा. संपर्क मंत्री | सह अध्यक्ष |
| ३ | जिल्हाधिकारी | सदस्य |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५ | वरीष्ठ भू-वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण, यंत्रणा | सदस्य |
| ६ | कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद | सचिव |
| ७ | उप जिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य सचिव |

२. लाभार्थी निवडीच्या सर्व अटी व निकष वर नमूद केलेल्या संदर्भीय दिनांक १५ डिसेंबर, २००६ व संदर्भीय दिनांक २१ मे, २००७ नुसार राहतील. सदर समितीने लाभार्थी निवडीची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी.

३. समितीने अंतिम केलेल्या लाभार्थी यादीनुसार प्रशासकीय मान्यतेचे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित करावेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,**

**(बा. बा. नारायणकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

1) मा.राज्यपालांचे सचिव,
2) मा.मुख्यमंत्री,
3) मा.उप मुख्यमंत्री,
4) सर्व मा. मंत्री,
5) सर्व मा. राज्यमंत्री,
6) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
7) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
8) सर्व विभागीय आयुक्त,
9) महासंचालक, वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन, अमरावती,
10) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
11) जिल्हाधिकारी, (बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा.)
12) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा.)
13) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भू-जल सर्वेक्षण विकास यंत्रणा,(बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा.)
14) संचालक, समाजकल्याण, पुणे.
15) विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपुर, अमरावती.
16) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद, (बुलढाणा, अकोला, वाशिम,अमरावती, यवतमाळ व वर्धा.)
17) जिल्हा समाज कल्याण अधिकारी,(बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा.)
18) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा.)

**प्रत माहितीसाठी,**

1) मा.सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
2) मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो). नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
3) उप सचिव (मग्रारोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
4) सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी (रोहयो प्रभाग) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई. 5) निवडनस्ती, रोहयो-५.